PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sulavarchi poli
Year: 1980

Song: Me ragini anurag tu
Lyricist: Rajesh, Anant Jadhav

मी रागिणी अनुराग तू
सख्या सजणा प्रीती तुझ्यावरी
रे प्रीती तुझ्यावरी
मी चांदणी अन्‌ तू चंद्रमा
सख्या सजणा प्रीती तुझ्यावरी
रे प्रीती तुझ्यावरी

नयनी तुझ्या मी झुलावे
हृदयी गुंतवावे
हाती तुझ्या हात द्यावे
श्वासात त्या धुंद व्हावे
मी बासुरी अन्‌ सूर तू
सख्या सजणा प्रीती तुझ्यावरी
रे प्रीती तुझ्यावरी

मला वेड ना वैभवाचे
कशाला हवे स्वप्न त्याचे
तू देव अन्‌ दैव माझे
साफल्य या जीवनाचे
मला वेड ना वैभवाचे
कशाला हवे स्वप्न त्याचे
तू देव अन्‌ दैव माझे
साफल्य या जीवनाचे
आभाळ तू मी पाखरू
तुझे सजणा उडते नभांतरी
रे उडते नभांतरी

तुला सौख्य माझे मिळावे
तुझे दुःख सर्व मी घ्यावे
स्वप्नी तुझ्या मीच यावे
हे भाग्य सौभाग्य व्हावे
तू देवता मी आरती
तुझी सजणा करते मनांतरी
रे प्रीती तुझ्यावरी
मी रागिणी अनुराग तू
सख्या सजणा प्रीती तुझ्यावरी
रे प्रीती तुझ्यावरी
ला ला ल ला ल ला ला
ला ला ल ला ल ला ला
ला ला ल ला ल ला ला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*